**कायम विना अनुदान तत्वावर**

शिक्षण मंडळ कार्यालय,
पिंपरी-चिंचवड महानगरपालिका,पिंपरी-१८
क्रं.:-शिक्षण/खाप्राशा/३/कावि/८८/२०१३.
दिनांक :- १४/८ /२०१३

प्रति,

**मुख्याध्यापिका,**
गायत्री इंग्लिश मेडियम स्कुल
मोशी

**विषयः कायम विना अनुदानित तत्वावरील शासन मान्यता प्राप्त खाजगी प्राथमिक शाळांना नैसर्गिक वाढीचे वर्ग /अतिरिक्त तुकडयांना मंजूरी देणेबाबत...**

संदर्भ१) शासन निर्णय क्रं. व्हीएलएस/१००२/(१०००/०२)/प्राशि-३,दि.१४/१/०३

संदर्भांकित पत्रास अनुसरुन आपणाकडून प्राप्त झालेला प्रस्ताव विचारात घेता खाली नमूद इयत्तेच्या अतिरिक्त /नैसर्गिक वाढीच्या तुकडीस खाली दर्शविण्यात आलेल्या अटी व शर्तीच्या अधिन राहून मंजूर करण्यात येत आहे.

| शाळेचे नांव व पत्ता. | माध्यम | तुकडी वाढ प्रकार | कायम विना अनुदानित तत्वावर |
|---|---|---|---|
| गायत्री इंग्लिश मेडियम स्कुल मोशी | इंग्रजी | अतिरिक्त | इ. ४ थी व ५ वीच्या अतिरिक्त २ च्या तुकडीस |

शाळेने सदरचे वर्ग/तुकडी मंजूरीसाठी खाली नमूद केलेल्या अटीची पूर्तता करणे आवश्यक आहे.

**अटी व शर्ती :-**

१) शाळेत शासनाने वेळोवेळी विहीत केल्यानुसार शैक्षणिक व व्यावसायिक अर्हतेचा आवश्यक सक्षम कर्मचारी वृंद शासनाने वेळोवेळी विहीत केलेल्या वेतनश्रेण्या व सेवा शर्तीच्या अधिन राहून नेमला पाहिजे (एचएससी डी.एड/एसएससी डी.एड).
२) सदर शाळेंने तुकडयासाठी सर्व भौतिक, शैक्षणिक व व्यवस्थापन विषयक सुविधा उपलब्ध करुन द्यावयास पाहिजे.
३) सदर शाळेंने स्वच्छता गृहाची व पिण्याच्या पाण्याची सोय चांगली केलेली असावी.
४) शाळेने शासनाने वेळोवेळी विहीत केलेल्या अभ्यासक्रमाची अमंलबजावणी केली पाहिजे.
५) सदर मंजूर करण्यात येणा-या तुकडीमुळे परिसरातील इतर मान्यताप्राप्त प्राथमिक शाळेतील पदावर विपरीत परिणाम होणार नाही, याची खबरदारी घेणे आवश्यक आहे.
६) सदर शाळेच्या तुकडीस विद्यार्थी संख्या नियमबाहय निदर्शनास आल्यास तुकडी/वर्ग मान्यता रद्द करण्यात येईल.

14/8/013

**प्रशासन अधिकारी**
शिक्षण मंडळ
पिंपरी-चिंचवड महानगरपालिका
पिंपरी, पुणे-१८.

प्रतः- माहितीसाठी- मा. शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग, पुणे-०१.

Scanned with OKEN Scanner

शिक्षण मंडळ कार्यालय,
पिंपरी-चिंचवड महानगरपालिका,पिंपरी-१८
क्रमांकः-शिक्षण/खाप्राशा/३/कावि/१२०४/१३
दिनांकः- ४ /११/२०१३

**विषयः-सन २०१३-१४ या वर्षासाठी शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी निर्धारण**
**कायम विना अनुदानित**

संदर्भः-१) शासन निर्णय क्रं. पीआरई/७०७८/२३८२/सात, दिः- २८/०८/१९८०.
२) शासन निर्णय क्रं. पीआरई/१०९३/२२१/प्राशि-१ दिः- ३०/०१/१९९६.
३) शासन निर्णय क्रं. पीआरई/१०९३/२२१/प्राशि-१ दिः- ०२/०८/१९९६.

**शैक्षणिक संस्थेचे नांव :- स्वामी विवेकानंद शिक्षण प्रसारक मंडळ**
**शाळेचे नांव व पत्ता :- गायत्री इंग्लिशम`डियम स्कुल गंधर्वनगरी**
**माध्यम :- इंग्रजी**

**विद्यार्थी संख्या व तुकडयांची संख्या दर्शविणारा तक्ता क्रं. १.**

| शाळेतील विद्यार्थी संख्येबाबतचा तपशील | | इ.१ली | इ.२री | इ.३री | इ.४थी | इ.५वी | इ.६वी | इ.७वी | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | पटसंख्या | ९९ | ९२ | ११२ | ९५ | ६६ | ७९ | ४८ | ५९१ |
| २ | सरासरी हजेरी. | ९७ | ८४ | १०५ | ९१ | ६२ | ७५ | ४६ | ५६० |
| ३ | निकषानुसार मंजूर तुकडया. | २ | २ | २ | २ | २ | १ | १ | १२ |
| ४ | अनुदानित. | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| ५ | अंशतः अनुदानित. | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| ६ | विना अनुदानित | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| ७. | कायम विना अनुदानित | २ | २ | २ | २ | २ | १ | १ | १२ |
| **एकूण** (रखाना ४ ते ७) | | २ | २ | २ | २ | २ | १ | १ | १२ |

........ मागे पहा.

Scanned with OKEN Scanner

सन २०१३-१४ या शैक्षणिक वर्षात वरील तक्त्यातील विद्यार्थी सरासरी उपस्थितीनुसार मंजूर होणारे शिक्षक-शिक्षकेत्तर कर्मचारी दर्शविणारा तक्ता क्रं. २.

| मान्य होणाऱ्या पदाची अनुदान प्रकारानुसार वर्गवारी | मान्य होणारे ग्रेडेड मुख्याध्यापक पद | मान्य होणारा पदविधर प्राथमिक शिक्षक | मान्य होणारे उपशिक्षक | एकूण मान्य पदे | शिक्षकेत्तर कर्मचारी | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | कनिष्ठ लिपिक | शिपाई | एकूण |
| अनुदानित. | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| अशंतः अनुदानित. | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| विना अनुदानित | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| कायम विना अनुदानित. | १ | १ | ११ | १३ | ० | ० | ० |
| एकूण | १ | १ | ११ | १३ | ० | ० | ० |

**सुचनाः-**

१) आपल्या शाळेसाठी वर नमुद केल्याप्रमाणे सन २०१३-१४ या शैक्षणिक वर्षाकरिता पटसंख्या व उपस्थिती विचारात घेता शिक्षक :१३ व शिक्षकेत्तर कर्मचारी :० एकुण संख्या १३ मंजूर केली असून, यापुढे यावर्षी अगर त्यापुढील कोणत्याही वर्षी जादा शिक्षकांस मंजूरी दिली जाणार नाही, याची कृपया नोंद घ्यावी.

२) पुढील अगर त्यानंतरच्या एखाद्या वर्षी इ.२री ते ७ वी पर्यंतच्या एखाद्या वर्गास नैसर्गिक वाढीमुळे जादा तुकडीची आवश्यकता भासत असेल, तर इ. १ ली अगर अन्य वर्गाच्या मंजूर तुकडयातील तुकडी कमी करुन शाळाअंतर्गत समायोजनाने संबंधित वर्गास तुकडी उपलब्ध करुन देता येईल. त्याबाबतचा आवश्यक तसा प्रस्ताव मा. शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग, पुणे-१ यांना सादर करुन त्यास मान्यता घ्यावी.

३) १.५ कि. मी. अंतरात अन्य कोणत्याही प्राथमिक शाळा (जि.प. अगर खाजगी ) नसेल तर मात्र पटसंख्या वाढीमुळे जादा तुकडी आवश्यक असेल तर प्रशासन अधिकारी, शिक्षण मंडळ (प्राथमिक) यांचेमार्फत मंजूरीसाठी प्रस्ताव सादर करता येईल. तथापी पुर्व मंजूरीशिवाय कोणत्याही परिस्थितीत नवीन तुकडी सुरु करु नये. तसेच त्यावर शिक्षकांची नेमणूक करु नये.

४) शाळेने आपल्या अधिकारात इ. १ ली च्या प्रत्येक तुकडीमध्ये ५० पेक्षा जास्त विद्यार्थ्यांना प्रवेश देऊ नये. मा. प्रशासन अधिकारी, शिक्षण मंडळ, पिंपरी-चिंचवड महानगरपालिका, पिंपरी, पुणे-१८ यांच्या पुर्व मंजूरीने ही संख्या ६० पर्यंत वाढविता येईल.

५) वरील सुचनांचे काटेकोरपणे पालन करावे, अन्यथा अनुदान कपात अगर शाळेची मान्यता काढून घेणे, अशी कारवाई खात्याकडून केली जाईल, याची नोंद घ्यावी.

**प्रशासन अधिकारी**
शिक्षण मंडळ
पिंपरी-चिंचवड महानगरपालिका
पिंपरी, पुणे-१८.

प्रतिः-

**अध्यक्ष/सचिव**
**स्वामी विवेकानंद शिक्षण प्रसारक मंडळ**

प्रत : अधिक्षक, वेतन व भ.नि.नि.पथक (प्राथमिक) जि.प. पुणे.-०१. यांना माहितीसाठी.

D:\2012-2013.doc

Scanned with OKEN Scanner